GAME GLOBAL ALLIANCE FOR Mass Entrepreneurship

# ग्लोबल अलायंस फॉर मास आंत्रेप्रेन्यूरशिप (गेम) ने 'क्लाइमेट क्रांति' लाँच केली

## पुण्यात १००० पेक्षा जास्त युवकांना मिळणार आधार, पहिल्या टप्प्यातील अभियानातील ठरणार पहिला जिल्हा

**पुणे, मार्च २१, २०२३ :** ग्लोबल अलायंस फॉर मास आंत्रेप्रेन्यूरशिपने (गेम) हरित उद्यमतेची भावना जागृत करण्यासाठी तसेच भारताला हरित अर्थव्यवस्था बनविण्याच्या दिशेने मोठी पावले उचलण्यासाठी युवकांना सक्षम करण्याकरिता आपल्या क्लायमेट क्रांती फेलोशिप या प्रमुख अभियानाची सुरूवात करण्यासाठी सहकार्य केले आहे. या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात पथप्रदर्शक अभियान पुण्यातून सुरू होणार आहे. या पथप्रदर्शक टप्प्यात ५० खेड्यांतील १००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना हरित उद्योजक बनण्याकरिता पाठबळ देण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे येथे होणाऱ्या उद्घाटन समारंभात सुरू होईल. तिथे विद्यार्थ्यांना हरित उद्योजकांची व्याख्याने, ज्ञानमय कार्यशाळा आणि पीआर नेटवर्किंग असा कृतीप्रवण कार्यक्रम पाहायला मिळेल. त्यात निवडलेल्या विद्यार्थ्यांना नंतर हरित अर्थव्यवस्था, उद्योजकीय मानसिकता, व्यवसाय वाढीच्या योजना आखणे इत्यादींचे सखोल अभ्यासक्रम पुरवण्यात येतील. हवामान बदल आणि उद्योजकता यांमधील प्रेरणादायक शिक्षक आणि मार्गदर्शक यांच्या हायब्रिड मॉडेलद्वारे हे करण्यात येईल. तसेच हे विद्यार्थी विशिष्ट समस्या जाणून घेऊन त्यांच्या उपाय निर्मितीत सहभाग घेतील. या कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी आपल्या व्यवसायाच्या योजना तयार केल्या असतील आणि ते त्या तज्ज्ञ, गुंतवणूकदार आणि मार्गदर्शकांना सादर करतील. निवडलेल्या सर्व व्यवसायांचे विविध भागीदार संस्थांच्या माध्यमातून इनक्यूबेशन करण्यात येईल. तसेच काही बीज भांडवलही देण्यात येईल.

**ग्लोबल अलायंस फॉर मास आंत्रेप्रेन्यूरशिपने (गेम) चे सह-संस्थापक मदन पदकी म्हणाले,** "हवामान बदल हा वास्तविक आहे आणि ही आपल्या जगण्याची लढाई आहे. निव्वळ शून्याच्या (नेट झीरो) दिशेने आपल्या प्रगतीचा पुढचा टप्पा हा प्रायोगिक मॉडेल आणि तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीद्वारे युवकांद्वारे चालवला जाणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून सर्वाधिक निकडीच्या आव्हानांवर उपाय शोधणाऱ्या कौशल्यांचा शोध घेणाऱ्या युवा नेतृत्वांची पुढची पिढी घडविण्याचे गेम यांचे लक्ष्य आहे. क्लायमेट क्रांती अभियान एका नवीन विचाराला म्हणजे उद्योजकीय मानसिकतेला नक्कीच खतपाणी घालेल. त्यातून विद्यार्थ्यांना स्वतःहून सार्थकतेने सहभागी होणे आणि 'हवामाल बदलाचे विजेते' होण्यास मदत होईल. पुढील सहा महिन्यांत संपूर्ण महाराष्ट्रातील ३० हजारांपेक्षआ जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोचण्याचे आमचे लक्ष्य आहे."

**पदकी पुढे म्हणाले,** "सोशल मीडिया, कार्यशाळा आणि महाविद्यालयांशी भागीदारीच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यासाठी गेमने जोशटॉकला सहभागी करून घेतले आहे. फेलोशिप आणि बिझिनेस इनक्यूबेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मदत करणअयासाठी त्यांनी वुईनॅचरिलिस्ट्स यांच्याशी भागीदारी केली आहे. महाराष्ट्रात लोकांपर्यंत पोचल्यानंतर ही योजना भारतभरात घेऊन जाण्याची आमची योजना आहे जेणेकरून १० लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी हरित उद्योजक बनतील."

**ग्लोबल अलायंस फॉर मास आंत्रेप्रेन्यूरशिप (गेम) विषयी :** भारतभरातील उद्योजकीय चळवळीला चालना देणे आणि विद्यमान आणि नवीन अशा दोन्ही उद्योगांच्या वाढीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे हे गेमचे ध्येय आहे जेणेकरून २०३० पर्यंत ५ कोटी नवीन नोकऱ्या उपलब्ध होतील. नवीन व्यवसायांमध्ये महिलांच्या मालकीचे व्यवसाय लक्षणीय प्रमाणात असावेत, याची सुनिश्चिती करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. अशाच प्रकारच्या आव्हानांना तोंड देत असलेल्या जगाच्या इतर भागांमध्ये अशाच चळवळींना प्रेरणा आणि

आधार मिळावी, अशी आम्ही आशा करतो. गेम ही एक ना-नफा संस्था असून ती ज्यूनिअर अचिव्हमेंट इंडिया सर्व्हिसेस अंतर्गत एक प्रकल्प म्हणून कार्यरत आहे. अधिक माहितीसाठी https://massentrepreneurship.org/ येथे भेट द्या:


**Media Contact:**
Naeem Shaikh | +91 90227 41986 | naeem.shaikh@one-source.co.in
Satasha Praharaj | +91 91240 04777 | satasha.praharaj@one-source.co.in